सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
व्यवस्थापन परिषदेच्या ५८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
गुरुवार, दि.१३ फेब्रुवारी, २०१४ दुपारी ०१:०० वा.

व्यवस्थापन परिषदेची ५८ वी बैठक गुरुवार, दि.१३ फेब्रुवारी, २०१४ रोजी दुपारी ०१:०० वाजता व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

अ.क्र.	सदस्याचे नांव	पद
१)	मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु	अध्यक्ष
२)	प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं.	सदस्य
३)	प्राचार्य श्री. पवार एस. के.	सदस्य
४)	प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी.	सदस्य
५)	डॉ. सुर्यवंशी एस. एस.	सदस्य
६)	डॉ. शिळीमकर टी. एन.	सदस्य
७)	डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर.	सदस्या
८)	ॲड. श्री. सलगर बी. एस.	सदस्य
९)	डॉ. करचे बी. आर.	सदस्य
१०)	डॉ. शेख ए. ए.	सदस्य
११)	श्री. गायकवाड बी. आर.	सदस्य
१२)	डॉ. लोणीकर एस. व्ही., प्र. परीक्षा नियंत्रक	सदस्य व कायम निमंत्रित
१३)	श्री. अनपट एस. बी., प्र. वित्त व लेखा अधिकारी	कायम निमंत्रित
१४)	श्री. माळी एस. के., कुलसचिव	सचिव

स्वागत:

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

अनुपस्थिती:

प्रा. डॉ. पाटील टी. आर. व डॉ. कदम एस. डी. यांनी दूरध्वनीद्वारे व सौ. मोहिते-पाटील पी. पी. यांनी पत्राद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित राहणार असल्याचे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. याशिवाय अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी, विभागीय सहसंचालिका, उच्च शिक्षण संचालनालय, शिक्षण संचालक पुणे यांचे प्रतिनिधी हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

अभिनंदनाचा ठराव:

"लोकमत नॅशनल एज्युकेशन लीडरशिप ॲवार्ड" विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ. एन. एन. मालदार यांना Award for Outstanding Contribution to Education जाहीर झाल्याने त्यांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते करण्यात आला.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[१] दि.२६ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ५६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव: दि.२६ नोव्हेंबर, २०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ५६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून खालील दुरुस्तीसह सर्वानुमते कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

१) पान क्र. ४४ वर, ठराव क्र. १० मध्ये, "विद्यापीठात सुरु असलेला एम. बी. ए. हा अभ्यासक्रम बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेल्या शिफारशीचा विचार करुन हा अभ्यासक्रम स्थगित करण्यास मान्यता देण्यात आली" अशी दुरुस्ती करण्यात आली.

२) पान क्र. ५० वर, ठराव क्र. १६ मध्ये, "विभागीय संशोधन शिष्यवृत्तीबाबत तयार केलेल्या नियमावलीस विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून त्यास व्याकरणाच्या दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली" अशी दुरुस्ती करण्यात आली.

[०२] दि.१५ जानेवारी, २०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या ५७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव: दि.१५ जानेवारी, २०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या ५७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून खालील दुरुस्तीसह सर्वानुमते कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

१) पान क्र. ६० वरील मूळ ठराव क्र. ५ खालीलप्रमाणे आहे.

विद्यापीठातील एकत्रित वेतनावरील कर्मचारी वगळता मनुष्यबळ पुरवठादारामार्फत कार्यरत असणाऱ्या संगणक लेखनिक, डाटा एंट्री ऑपरेटर, वाहनचालक, प्रयोगशाळा सहायक, प्रयोगशाळा परिचर, शिपाई, माळी व चौकीदार या रोजंदारी वरील कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनामध्ये दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून १०% वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

"विद्यापीठातील मनुष्यबळ पुरवठादारामार्फत कार्यरत असणाऱ्या संगणक लेखनिक, डाटा एंट्री ऑपरेटर, वाहनचालक, प्रयोगशाळा सहायक, प्रयोगशाळा परिचर, शिपाई, माळी, चौकीदार व एकत्रित वेतनावरील आणि मानसेवी लेखनिक या अस्थाई कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनामध्ये दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून १०% वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला".

[०३] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

ठरावः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.

[०४] सन शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ चा मराठी / इंग्रजी वार्षिक अहवाल पुस्तक व सी. डी. स्वरुपात तयार करुन घेण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम, १०४ या तरतूदीनूसार विद्यापीठाचा वार्षिक अहवाल तयार करणे आवश्यक आहे. शासनाचे पत्र क्र. विवाअ २०१३/प्रक्र.६/विशि-३ दि.३१ ऑक्टोबर, २०१३ नुसार वार्षिक अहवालाच्या सी.डी. स्वरुपातील (Soft Copy) ७०० प्रती तसेच मराठी व इंग्रजीच्या पुस्तक रुपाने प्रत्येकी २०० प्रती व मराठी - इंग्रजी एकत्रित असल्यास प्रत्येकी २०० प्रती विधानमंडळ सचिवालयाला पाठविण्यासाठी शासनास पाठविणे आवश्यक आहे.

त्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाचा सन २०१२-१३ चा मराठी वार्षिक अहवाल पुस्तक स्वरुपात ५०० प्रती, त्याचप्रमाणे इंग्रजी वार्षिक अहवाल पुस्तक स्वरुपात २५० प्रती व मराठी व इंग्रजी वार्षिक अहवालाच्या ८०० सी. डी. तयार करण्यासाठी दि.०२/०१/२०१४ रोजी दै. सकाळ या वृत्तपत्रामधून जाहीर निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार अंतिम दि.२४/०१/२०१४ पर्यंत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त झालेल्या ४ निविदा दि.२९/०१/२०१४ रोजी उघडण्यात आल्या असून त्यापैकी एक निविदा तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरली असून ३ पात्र ठरल्या आहेत. पात्र ठरलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडण्यात आला आहे.

प्राप्त निविदेचा तुलनात्म्क तक्ता विचारात घेता, मे. अनिल प्रिंटीग प्रेस, सोलापूर यांनी मराठी पुस्तक स्वरुपातील अहवालाच्या ५०० प्रतीचे प्रति नग रु.२०९/- प्रमाणे (एकूण अहवालाचे अंदाजे पाने पाठपोठ ५२०) व इंग्रजी पुस्तक स्वरुपातील २५० प्रतीचे प्रति नग रु.३०९/- प्रमाणे (एकूण अहवालाचे अंदाजे पाने पाठपोठ ५२०) आणि मराठी व इंग्रजी वार्षिक अहवालाच्या एकूण ८०० सी. डी. प्रति नग रु.१८/- प्रमाणे सर्व मिळून अंदाजे रक्कम रु.१,९६,१५०/- (सर्व करासह) छपाई करुन विद्यापीठास पोहोच देण्याचे मान्य केले आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०१२-१३ चा वार्षिक अहवाल पुस्तक स्वरुपात व सी. डी. स्वरुपात मे. अनिल प्रिंटीग प्रेस, सोलापूर यांच्याकडून मराठी अहवालाचे ५०० प्रतीचे प्रति नग रु.२०९/- प्रमाणे व इंग्रजी अहवालाचे २५० प्रतीचे प्रति नग रु.३०९/- या दराने पुस्तक स्वरुपात छपाई करणे व दोन्ही भाषेतील वार्षिक अहवालाच्या ८०० सी. डी. प्रति नग रु.१८/- प्रमाणे तयार करुन घेण्याची बाब विचारार्थ).

ठराव: सन शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ चा मराठी / इंग्रजी वार्षिक अहवाल पुस्तक व सी. डी. स्वरुपात मे. अनिल प्रिंटीग प्रेस, सोलापूर यांच्याकडून मराठी अहवालाच्या ५०० प्रतीचे प्रति नग रु.२०९/- प्रमाणे व इंग्रजी अहवालाचे २५० प्रतीचे प्रति नग रु.३०९/- या दराने पुस्तक स्वरुपात छपाई करणे व दोन्ही भाषेतील वार्षिक अहवालाच्या ८०० सी. डी. प्रति नग रु.१८/- प्रमाणे तयार करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[०५] राज्यातील अकृषी विद्यापीठे / शासकीय महाविद्यालये/ संस्था / अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या आरक्षणाची बाब माहितीस्तव.

(टिपणी: दि.२२ जानेवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील अकृषी विद्यापीठे / शासकीय महाविद्यालये / संस्था / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांसाठीचा विषयनिहाय आरक्षण लागू करण्याचा दि.२४ एप्रिल, १९९५ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन संबंधित संस्थेच्या सर्व महाविद्यालयातील एकाच शिक्षकीय संवर्गातील (वेतनश्रेणीत) सर्व विषयातील मंजूर पदे एकत्रित करुन दि.१८ ऑक्टोबर, १९९७ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे संवर्गनिहाय आरक्षणाची गणना करण्याबाबत निर्देश दिलेले असून, सदर शासन निर्णय दि.२२ जानेवारी, २०१४ पासून अंमलात राहील, असे नमूद केलेले आहे.

सबब, उक्त शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

ठराव: राज्यातील अकृषी विद्यापीठे / शासकीय महाविद्यालये/ संस्था / अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या आरक्षणाबाबतच्या दि.२२/०१/१४ च्या शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली.

[०६] विद्यापीठात कार्यरत असलेल्या अपंग कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.

टिपणी: उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.अपंग-२०११/प्र.क्र.१/२०११/आस्था-२, दि.२०/०५/२०१३ नुसार, शासकीय / निमशासकीय सेवेत नियुक्त झालेल्या / होणाऱ्या अंध / क्षीणदृष्टी / मुकबधीर व अस्थिव्यंग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे उपलब्ध करुन देण्याबाबत शासन निर्णय क्र.अपंग-२०१२/प्र.क्र.३२/अ.क.-२, दि.१६/०५/२०१३ नुसार कार्यवाही करण्यात यावी असे कळविलेले आहे.

विद्यापीठातील खालील अपंग कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयानुसार सहाय्यक तंत्रज्ञान/उपकरणे मिळण्याबाबत विनंती अर्ज केलेले आहेत. तसेच पुरवठादारामार्फत उपकरणे खरेदी करण्यासाठी कोटेशन घेण्यात आलेले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ. क्र.	प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे नाव	पदनाम	अपंगाचे प्रकार व टक्केवारी	मागणी केलेली उपकरणे	कोटेशनातील दर (रु.)
१	श्री. काळे हर्षल भारत	प्रयोगशाळा सहायक	अस्थिव्यंग ५०%	स्कुटर वुईथ ॲडप्शन	६५,३९३/-
२	श्री. येणगुरे भिमराया सिद्रामप्पा	कनिष्ठ लिपिक	अस्थिव्यंग ४०%	स्कुटर वुईथ ॲडप्शन	६५,३९३/-
३	श्रीमती. कलादगी आसरा मुशरफ	कनिष्ठ लिपिक	मुकबधीर ११० dB	कौनवर्सर प्रो वायरलेस एफ्म FM असिस्टिव सुनावणी नियमन यंत्र	३९,८५०/-
४	श्री. पवार तुकाराम किसनराव	दुरध्वनीचालक	अंध १००%	जौज प्रोफेशनल टौकिंग सॉफ्टवेअर (इंग्रजी, हिंदी आणि मराठी भाषासाठी)	४९,९४५/-
५	श्री. सुरवसे राहुल पांडुरंग	प्रयोगशाळा परिचर	कर्णबधीर ४५%	कौनवर्सर प्रो वायरलेस एफ्म FM असिस्टिव सुनावणी नियमन यंत्र	३९,८५०/-
६	श्रीमती साखरे अंजली शैलेश	शिपाई	अस्थिव्यंग ४५%	स्कुटर वुईथ ॲडप्शन	६५,३९३/-
७	श्री. पवार विनायक परशुराम	शिपाई	अस्थिव्यंग ४५%	स्कुटर वुईथ ॲडप्शन	६५,३९३/-

तसेच उपकरण खरेदीबाबत सामाजिक न्याय विभागाच्या दि.०३/०६/२०११ व दि.२०/०७/२०११ च्या शासन निर्णयान्वये, दि.३१ मार्च, २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याचप्रमाणे अपंग कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यानंतर तीन महिन्याच्या आत सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे पुरवणे बंधनकारक आहे. यासाठी सामाजिक न्याय विभागाने दि.१४/०२/२०१२ रोजीच्या परिपत्रकान्वये, दिलेल्या स्पष्टीकरणात्मक सूचना व दि.०८/०२/२०१३ रोजीच्या तरतूदीचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यावाही करण्याबाबतही पत्रात नमूद केलेले आहे.

तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शा.नि. क्र.अपंग-२०१२/प्र.क्र.३२/अ.क.-२ दि.०८/०२/२०१३ मधील अ.क्र.१(क) मध्ये स्कुटर वुईथ ॲडप्शन उपकरणाची किंमत रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास विभागाने /कार्यालयाने अपंगाकरीता राखीव ठेवण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीतून रु.५०,०००/- मंजूर करावी व उर्वरित रक्कम मागणीधारक कर्मचाऱ्यास वाहन अग्रिम (Vechicle Advance) या स्वरुपात मंजूर करावे व सदर वाहन अग्रिमाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्याकडून समान हप्त्यात वसूल करावी असे नमूद केलेले आहे.

उपरोक्त कर्मचाऱ्यांना सहाय्यक उपकरणे व तंत्रज्ञानाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून करावा, याबाबत पत्र क्र.SOL/SUS/EST/२०१२-१३/८९८४, दि.०८/१०/२०१२ अन्वये मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडे मार्गदर्शन मागितले असता, याबाबत प्रचलित शासन निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे दि.३०/०५/२०१३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तसेच अपंग कर्मचाऱ्यांना सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे देण्याबाबत वित्त व लेखा विभाग यांचे अभिप्राय मागितले असता, या बाबीसाठी अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध नाही. त्यामुळे यासाठी Account code मध्ये देण्यात आलेल्या नियमानुसार, Reappropriation करण्यात यावे. सदर अभिप्राय हे आर्थिक बाबीपुरते मर्यादित आहेत. शासन निर्णयाचे तसेच विद्यापीठातील नियमांचे अवलोकन करुन प्रशासकीय निर्णय आपल्या स्तरावरुन घेण्यात यावा असे कळविले आहे.

सबब, उपरोक्त प्रशासकीय अपंग कर्मचाऱ्यांना वरीलप्रमाणे सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे ही विद्यापीठ फंडातून उपलब्ध करुन देण्यासाठी मान्यता असावी. तसेच सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे ही विद्यापीठ फंडातून उपलब्ध करुन देवून अनुदानासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची बाब विचारार्थ सादर).

ठराव: विद्यापीठात कार्यरत असलेल्या अपंग कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे विद्यापीठ फंडातून उपलब्ध करुन घेण्यास व तसेच अनुदानासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[०७] विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक विचारार्थ.

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२)(e) आणि १०१ नुसार, विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्याकरिता महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता कलम २.१२ नुसार खालीलप्रमाणे अर्थसंकल्प उपसमिती गठीत करण्यात आली होती.

१.	प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर	अध्यक्ष
२.	श्री. बी. आर. गायकवाड	सदस्य
३.	प्रा. डॉ. ए. ए. शेख	सदस्य
४.	श्री. एस. बी. अनपट	सदस्य सचिव

उपरोक्त उपसमितीने दि.०७ व ०८ जानेवारी, २०१४ रोजी सर्व विभाग व संकुलप्रमुख यांच्यासमवेत बैठक घेऊन व त्यांच्याशी चर्चा करुन तयार केलेले सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक वित्त व लेखा समितीच्या दि.०४/०२/२०१४ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.०३ नुसार सादर केले असता, त्यावर सर्वंकष चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव: सन २०१३-१४ च्या सुधारित अंदाजपत्रकास व सन २०१४-१५ च्या मूळ अंदाजपत्रकास दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

सबब, विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१४-१५ च्या मूळ अंदाजपत्रकास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१४-१५ च्या मूळ अंदाजपत्रकास व्याकरणाच्या व स्पेलिंगच्या दुरुस्तीसह सर्वानुमते अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

[०८] D.G.S. & D., Govt. of India, New Delhi यांच्याकडील Rate Contract मधून विद्यापीठाकडील विभाग व संकुलासाठी संगणक खरेदीची बाब विचारार्थ.

(टिपणी: विद्यापीठाकडील विविध विभाग व संकुलांनी संगणक मागणी केलेली असून त्यास मा.कुलगुरुमहोदय यांनी मान्यता दिलेली आहेत.

दि.२२/११/२०१३ रोजीच्या टिपणीन्वये, संगणक खरेदीसाठी तांत्रिक समिती गठीत केलेली आहे. सदर तांत्रिक समितीने D.G.S.&D., Govt. of India, New Delhi यांच्याकडील दरकरारातील item No.19 - HP/3330 Desktop या मॉडेलच्या संगणक खरेदीची शिफारस केली आहे. सदर मॉडेलची प्रति नग किंमत रु.४०,०००/- + Taxes extra असून विविध विभाग व संकुले यांची एकूण १२९ संगणकाची मागणी विचारात घेता, रु.५१,६०,०००/- + Taxes extra इतका खर्च येणार आहे.

नजिकच्या काळात खरेदीचा कोणताही विषय नसल्यामुळे मा.कुलगुरुमहोदय यांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये खरेदी समितीच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सदर खरेदीवर होणारा खर्च हा XII Plan General Development Assistance Scheme (UGC) या अंदाजपत्रकीय तरतूदीतून होणार आहे.

सदरचा विषय दि.०४/०२/२०१४ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.०२ नुसार सादर केला असता, त्यावर सर्वंकष चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव: D.G.S. & D., Govt. of India, New Delhi यांच्याकडील दरकरारातील item No.19 - HP/3330 Desktop हे मॉडेल एकूण १२९ नग किंमत अंदाजे रु.४०,०००/- + Taxes extra याप्रमाणे प्रति नग संबंधित कंपनीबरोबर करारनामा करुन खरेदीची पुढील प्रक्रिया करण्यास मान्यतेची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.

सबब, उपरोक्त खरेदीचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: D.G.S. & D., Govt. of India, New Delhi यांच्याकडील Rate Contract मधून Item No.19-HP/3330 Desktop हे मॉडेल एकूण १२९ नग किंमत अंदाजे रु.४०,०००/- + Taxes याप्रमाणे विद्यापीठाकडील विविध विभाग व संकुलासाठी संगणक खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[०९] विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५(२)(e) आणि १०१ नुसार, विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक अधिसभेच्या दि.१५/०३/२०१४ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यात येणार आहे.

सबब, विद्यापीठाचे सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१४-१५ चे मूळ अंदाजपत्रक अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाची बाब विचारार्थ).

ठराव: विद्यापीठाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१३-१४ चे मूळ अंदाजपत्रक अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने डॉ. श्रीमती एस. आर. याजमान्य यांचे नामनिर्देशन करण्यात आले.

[१०] परीक्षा विभागाकरीता दरकरारानुसार Lipi Printer - LIPI -6610L Line Matrix Printer speed in LPM 1000 Column 132 port parallel and one serial - 1 नग प्रिंटर खरेदीची बाब विचारार्थ.

(टिपणी: परीक्षा विभागाकडे सद्यस्थितीत १३२ कॉलमचे ६१०० व ६३१२ लाईन मॅट्रीक्स असे दोन Lipi Printer आणि Laser printer Lipi डॉट मॅट्रीक्स एक असे एकूण तीन प्रिंटर आहेत. सदर १३२ कॉलमचे ६१०० व ६३१२ हे दोन प्रिंटर आणि त्यातील स्पेअरपार्ट वारंवार नादुरुस्त होत नसल्याने सारखीच दुरुस्ती करावे लागते तसेच ६१०० या प्रिंटरची परीक्षेच्या गोपनीय छपाईच्या कामास दिरंगाई होत आहे. मे. लिपी डाटा सिस्टीम्स लि. पुणे यांनी दि.१७/१/२०१४ रोजीच्या पत्रानुसार ६१०० या प्रिंटरची AMC ऑक्टोबर २०१४ नंतर स्वीकारण्यात येणार नसल्याचे कळविले आहे. त्यानुसार छपाई कामासाठी लिपी प्रिंटर खरेदी करणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या DGS&D नवी दिल्ली या कार्यालयाकडील प्राप्त पत्र क्र.DTPERIPHRL/IT-१/RC-७२०१०००००/०२१४/८१/००२६७/४२१३/४८९५८, Dt.२६/९/२०१३ नुसार मे. लिपी डाटा सिस्टीम्स लि. पुणे यांचे सदर प्रिंटरचे दर करार असून सोबत दरकराराची प्रत जोडली आहे.

त्यानुसार छपाई कामाची निकड व आवश्यकता विचारात घेता, सदर कालावधीमध्ये खरेदी व वित्त लेखा समितीची बैठक आयोजित नसल्याने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ अन्वये कलम १४ (७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरुमहोदय यांनी खरेदी समितीच्या वतीने केंद्र शासनाच्या दरकरारनुसार, मे. लिपी डाटा सिस्टीम्स लि. पुणे यांच्याकडून Lipi Printer - LIPI ३ ६६१० L Line Matrix Printer speed in LPM १००० Column १३२ port parallel and one serial -१ नग प्रिंटर रू.२,५७,२५०/-[Vat Inclusive] इतक्या रक्कमेच्या खरेदीस व सदरचा खर्च हा UGC XII FYP या लेखाशिर्षकाखाली खर्ची टाकण्याची बाब स्विकारुन मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरचा विषय वित्त व लेखा समितीच्या दि.०४/०२/२०१४ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.०४(१) नुसार सादर केले असता, त्यावर सर्वंकष चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव: DGS&D यांचेकडील दरकरारातील Lipi Printer - LIPI - ६६१० L Line Matrix Printer speed in LPM १००० Column १३२ port parallel and one serial हे मॉडेल १ नग किंमत रु.२,४५,०००/- + Taxes extra इतक्या रकमेस संबंधित कंपनीबरोबर करारनामा करुन खरेदीची पुढील प्रक्रिया करण्यास मान्यतेची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.

सबब, उपरोक्त खरेदीचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: परीक्षा विभागाकरीता दरकरारानुसार Lipi Printer - LIPI -6610L Line Matrix Printer speed in LPM 1000 Column 132 port parallel and one serial - 1 नग प्रिंटर रु.2,45,000/- + Taxes इतक्या रक्कमेस करारनामा करुन खरेदीची पुढील प्रक्रिया करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[११] विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातर्फे आयोजित नियतकालिक स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थी लेखक कलाकारांना प्रथम, व्दीतीय व तृतिय पुरस्कार स्वरूपात देण्यात येणारे रक्कम अनुक्रमे रु.५००/-, रु.३००/-व रु.२००/- प्रमाणे वाटप करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहिती तथा मान्यतेस्तव.

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातर्फे प्रसिध्द होणा-या नियतकालिकाची स्पर्धा विद्यापीठाच्या स्थापनेपासुन आयोजित करण्यात येत आहे. सन २००४-०५ च्या अहवालात नमुद केल्याप्रमाणे प्रति वर्षाप्रमाणे २०११-१२ या वर्षात सदर स्पर्धेचे आयोजन करून १.व्यवसायिक २. पारंपरिक या दोन्ही विभागात स्पर्धेसाठी खालील प्रमाणे प्रथम व्दीतीय व तृतिय असे बक्षिस दिले जाते.

महाविद्यालयांना देण्यात येणारे बक्षिसाचे स्वरूप

१) कविता : मराठी	२) एकांकिका	३) ललित लेख ललित निबंध
४) व्यक्तीचित्रे रेखाचित्रे	५) मुलाखत	६) आत्म कथनात्मक लेख
७) विनोदी लेखन	८) ललित लेखन	९) अर्थकारण माहितीपर लेखन
१०) समीक्षा	११) कविता : इंग्रजी	१२) कथा / कहानी
१३) एकांकिका	१४) ललित निबंध	१५) व्यक्तीचित्रे रेखाचित्रे
१६) मुलाखत	१७) आत्म कथनात्मक लेख	१८) ललित लेखन
१९) अर्थकारण माहितीपर लेख	२०) कथा कहानी : संस्कृत	२१) कविता
२२) एकांकिका	२३) ललित निबंध	२४) व्यक्तीचित्रे रेखाचित्रे
२५) मुलाखत	२६) आत्म कथनात्मक लेखन	२७) विनोदी लेख हास्य व्यंग
२८) ललित लेख	२९) अर्थकारण माहितीपर लेखन	३०) सामाजिक शास्त्रे
३१) पर्यावरणशास्त्र	३२) विज्ञान लेख	३३) तांत्रिक लेख
३४) पेन्सिल स्केच	३५) पेंटिंग	३६) व्यंगचित्र
३७) फोटोग्राफी	३८) व्यक्तिचित्र लेख : उर्दू	३९) मुलाखत
४०) माहितीपर लेखन (सूचना लेख)	४१) कथा कहानी : हिंदी	४२) कविता
४३) एकांकिका	४४) ललित लेख	४५) व्यक्तिचित्र

४६) मुलाखत	४७) आत्मकथन पर लेखन	४८) विनोदी लेख (हास्य व्यंग)
४९) ललित लेखन	५०) अर्थकारण व महितीपर लेखन	५१) विधी विभाग
५२) कथा कहानी कन्नड विभाग	५३) कविता कन्नड विभाग	५४) ललित निबंध
५५) व्यक्तिचित्रे रेखाचित्रे	५६) मुलाखत	५७) आत्मकथनात्मक लेख कन्नड
५८) विनोदी लेख हास्यव्यंग	५९) ललित लेख	६०) अर्थकारण व माहितीपर लेखन
६१) अभियांत्रिकी लेख	६२) शिक्षण विभाग	

उपरोक्तबाबत नियतकालिक स्पर्धेत देण्यात येणाऱ्या बक्षिसांची रक्कम आदा करण्याबाबतचा ठराव अथवा पूर्व मान्यता या विभागाकडे उपलब्ध नाही. तथापि, याबाबत नियतकालिका स्पर्धेचे आयोजन केल्याचे सन २००५-०६ च्या विद्यापीठाच्या वार्षिक अहवालात नोंद दिसून येते.

व्यावसायिक महाविद्यालयास देण्यात येणारी रक्कम			
	बक्षिसाची रक्कम	बक्षिसाची संख्या	
प्रथम	५००/-	६२	३१,०००/-
व्दितीय	३००/-	६२	१८,६००/-
तृतीय	२००/-	६२	१२,४००/-
			६२,०००/-
पारंपारिक महाविद्यालयास देण्यात येणारी रक्कम			
प्रथम	५००/-	६०	३०,०००/-
व्दितीय	३००/-	६०	१८,०००/-
तृतीय	२००/-	६०	१२,०००/-
			६०,०००/-

तरी उपरोक्त तक्ता विचारात घेता, नियतकालिक स्पर्धेकरिता प्रति वर्षी बक्षिसांसाठी रु.१,२२,०००/- व नियतकालिका स्पर्धा आयोजित करत असताना विविध समित्या स्थापन करणे आवश्यक असते तसेच त्यांच्या बैठका आयोजित केल्यानंतर त्यांना आदा करण्यात येणारा प्रवास खर्च व दैनिक भत्ता यांचा विचार होता रु.६०,०००/- खर्च अपेक्षित आहे. बक्षिसांची रक्कम व उपरोक्त प्रवास खर्च व इतर स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्राच्या खर्चाचा विचार करता एकूण रु.१,७२,०००/- खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार व्यावसायिक व पारंपरिक महाविद्यालयाच्या नियतकालिक स्पर्धांसाठी होणारा खर्च व या स्पर्धा प्रतिवर्षी, कायमस्वरूपी आयोजित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात सुरुवातीपासून आयोजित करण्यात येणाऱ्या नियतकालिक स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थी लेखक कलाकारांना प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्कार स्वरुपात देण्यात येणारी रक्कम अनुक्रमे रु.५००/-, रु.३००/- व रु.२००/- प्रमाणे वाटप करण्यास तसेच अनुषंगिक खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[१२] संशोधन व मान्यता समिती व विभागीय संशोधन समितीच्या बैठकीस उपस्थित राहणाऱ्या संशोधन मार्गदर्शक यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देण्याची बाब विचारार्थ.

(टिपणीः सोलापूर विद्यापीठातंर्गत पीएच. डी. अभ्यासक्रमास प्रवेश देण्यासाठी विभागीय संशोधन समिती (DRC) व संशोधन व मान्यता समितीची (RRC) बैठक बोलविण्यात येते. सदर बैठकीसाठी संशोधक मार्गदर्शक यांना हजर राहण्याबाबत कळविण्यात येते. तथापि, त्यांना प्रवासभत्ता व दैनिकभत्ता (TA/DA) दिला जात नाही.

सदर संशोधक मार्गदर्शक यांच्याकडून वारंवार प्रवासभत्ता व दैनिकभत्ता याची मागणी केली जाते. प्रवासभत्ता व दैनिकभत्ता (TA/DA) देण्याची कोणतीही तरतूद अथवा पद्धत अथवा नियम अस्तित्वात नसल्याने त्यांना प्रवासभत्ता व दैनिकभत्ता (TA/DA) दिला जात नाही.

सबब, संशोधन व मान्यता समिती व विभागीय संशोधन समितीच्या बैठकीस उपस्थित राहणाऱ्या संशोधक मार्गदर्शक यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देण्याची बाब विचारार्थ).

ठरावः संशोधन व मान्यता समितीच्या बैठकीस उपस्थित राहणाऱ्या संशोधक मार्गदर्शकांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता संबंधित केंद्राकडे जमा होणाऱ्या फीमधून देण्यात यावा. मात्र विभागीय संशोधन समितीच्या बैठकीस उपस्थित राहणाऱ्या संशोधक मार्गदर्शकांना असा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता आदा करण्यात येवू नये असे सर्वानुमते ठरले.

[१३] दि.३१/०१/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगाव, जि.रायगड या विद्यापीठाच्या सोलापूर येथे उभारण्यात येणाऱ्या उपकेंद्रासाठी ५ एकर जमीन व आवश्यक पदे त्यावर कार्यरत अधिकारी / शिक्षकेतर पदे देण्याची बाब विचारार्थ.

(टिपणीः महाराष्ट्र शासनाच्या दि.०९/०१/२०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत उच्च दर्जाच्या तंत्र शिक्षणासाठी समन्वय साधणारे तंत्रशास्त्र विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यानुसार राज्यात ०४ विभागीय केंद्रे, तर ०५ उपकेंद्रे सुरु करण्यात येणार आहेत.

शासन निर्णय क्र.HTED-११०३०(११)/१/२०१३-MHT-(TE-२) दि.३१/०१/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे (ता.माणगाव, जि.रायगड) येथील उपलब्ध सोयी सुविधा व साधन सामग्री विचारात घेता, राज्यात इतरत्र नवीन तंत्रशास्त्र विद्यापीठ स्थापन न करता सदर एकाकी विद्यापीठास राज्यातील इतर महाविद्यालये संलग्नित करावयाचे अधिकार प्रदान करुन या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रभर निर्धारीत करण्यास तसेच मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथे या विद्यापीठाची विभागीय कार्यालये तथा कोल्हापूर, सोलापूर, अमरावती, नांदेड व जळगाव येथे विद्यापीठाची उपकेंद्रे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

यानुसार, सोलापूर विद्यापीठाकडे असणाऱ्या सद्यस्थितीतील जमिनीतून ५ एकर जागा नव्याने होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगाव, जि.रायगड या विद्यापीठाच्या सोलापूर येथील उपकेंद्रास द्यावी लागणार असून या उपकेंद्राकरिता आवश्यक अधिकारी / शिक्षकेतर कर्मचारी पदे वर्ग करण्यात यावेत असेही शासन निर्णयात नमूद केलेले आहे.

या उपकेंद्रास ४८२ एकरातील ५ एकर जमीन देता येईल. परंतु, सद्यस्थितीत विद्यापीठास मंजूर असलेल्या २१० पदांपैकी ५३ पदे रिक्त आहेत व ही पदे भरण्यास शासनाने निर्बंध घातल्याने कर्मचाऱ्यांचा तुटवडा असल्यामुळे या उपकेंद्रास आवश्यक पदे त्यावर कार्यरत अधिकारी / शिक्षकेतर पदे देता येणे शक्य होणार नाही. याबाबत, शासनाकडून मार्गदर्शन घेणे उचित राहील.

सबब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, (ता.माणगाव, जि. रायगड) या विद्यापीठाच्या सोलापूर येथे उभारण्यात येणाऱ्या उपकेंद्राकरिता ४८२ एकर जमिनीतून ५ एकर जमीन देण्याची बाब विचारार्थ तसेच अधिकारी /शिक्षकेतर पदे देणे याबाबत शासनाकडून मार्गदर्शन घेण्याची बाब विचारार्थ).

ठरावः दि.३१/०१/२०१४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार, या विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड या विद्यापीठामध्ये जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्याकडून पत्र आल्यानंतर ४८२ एकर जागेपैकी ५ एकर जागा हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली. तथापि, या विद्यापीठात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने याबाबतीत शासनाकडे पत्रव्यवहार करावा असे सर्वानुमते ठरले.

[१४] सोलापूर विद्यापीठातंर्गत पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी प्रबंध मुल्यमापन व मौखिक परीक्षेसाठी सुधारीत मानधन देण्याची बाब विचारार्थ.

(टिपणीः सोलापूर विद्यापीठातंर्गत पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी प्रबंध मुल्यमापन व मौखिक परीक्षेसाठी खालीलप्रमाणे मानधन देण्यात येते.

अ.क्र.	परीक्षकांचे नाव	प्रबंध मुल्यमापन मानधन रु.	मौखिक परीक्षा मानधन रु.
१.	संशोधक मार्गदर्शक / बहिस्थ परीक्षक व अंतर्गत परीक्षक	५००/-	११०/-

उक्त मानधन या विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वी शिवाजी विद्यापीठाकडून ठरविण्यात आलेले आहे. सदर मानधनामध्ये कालानुरुप वाढ होणे आवश्यक आहे.

उक्त मानधनामध्ये खालीलप्रमाणे प्रस्तावित वाढ सुचविण्यात येत आहे.

अ.क्र.	परीक्षकांचे नाव	प्रबंध मुल्यमापन मानधन रु.	मौखिक परीक्षा मानधन रु.
१.	संशोधक मार्गदर्शक	५००/-	२००/- प्रत्येकी
२.	बहिस्थ परीक्षक व अंतर्गत परीक्षक	१५००/- प्रत्येकी	

सदर मानधनामध्ये प्रस्तावित केलेल्या वाढीस महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(w) प्रमाणे व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, सोलापूर विद्यापीठातंर्गत पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रबंध मुल्यमापन व मौखिक परीक्षेसाठी सुधारीत मानधन देण्याची बाब विचारार्थ).

ठरावः सोलापूर विद्यापीठातंर्गत पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी प्रबंध मुल्यमापन व मौखिक परीक्षेसाठी खालीलप्रमाणे सुधारीत मानधनास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

अ.क्र.	**परीक्षकांचे नाव**	**प्रबंध मुल्यमापन मानधन रु.**	**मौखिक परीक्षा मानधन रु.**
१.	**संशोधक मार्गदर्शक**	**५००/-**	**२००/- प्रत्येकी**
२.	**बहिस्थ परीक्षक व अंतर्गत परीक्षक**	**१५००/- प्रत्येकी**	

[१५] सोलापूर विद्यापीठांतर्गत चेंजेस इन स्टाफ या समितीवर रिक्त असलेल्या पदावर नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ४१ अन्वये (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर Ordinances framed under sec ५३ मधील दंडक ०.५९ प्रमाणे) व्यवस्थापन परिषदेकडून सोलापूर विद्यापीठांतर्गत चेंजेस इन स्टाफ या समितीवर मा. प्राचार्य. डॉ. भांजे बी. एम. यांचे नामनिर्देशन करण्यात आले होते. तथापि, मा. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ पदावर प्राचार्य. डॉ. भांजे बी. एम. यांची नियुक्ती झाल्याने चेंजेस इन स्टाफ समितीतील त्यांच्या सदस्यत्वाचे पद रिक्त झाले आहे. सदर रिक्त पदावर नवीन सदस्याचे नामनिर्देशन व्यवस्थापन परिषदेकडून होणे आवश्यक आहे. यास्तव चेंजेस इन स्टाफ समितीवर नामनिर्देशनास्तव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठरावः सोलापूर विद्यापीठांतर्गत चेंजेस इन स्टाफ या समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्यांमधून डॉ. बी. आर. कर्चे यांचे नामनिर्देशन करण्यात आले.

[१६] जनविकास केंद्राअंतर्गत चालणाऱ्या विविध अभ्यासक्रमाकरिता संस्था संलग्नीकरण व नूतनीकरणाचे शुल्क वाढविण्याबाबत.

टिपणी: जनविकास केंद्रामार्फत चालणाऱ्या विविध पॅरॉमेडिकल अभ्यासक्रमाकरिता संस्था संलग्निकरण शुल्क रु.१,०००/- इतके आहे. परंतू स्टडी मटेरियलसाठी येणारा खर्च व जनविकास केंद्रामार्फत विद्यापीठ समितीकडून संस्थाची होणारी तपासणी या सर्वांचा एकूण खर्च पाहता संलग्नीकरणाकरिता ठेवण्यात आलेले शुल्क रु.१,०००/- हे अत्यंत कमी आहे असे वाटते. जनविकास केंद्राच्या स्थापनेपासून संलग्निकरणाच्या व संलग्निकरणाच्या नुतनीकरणाच्या शुल्कामध्ये कोणताच बदल करण्यात आलेला नाही.

तरी पॅरॉमेडिकल अभ्यासक्रमाच्या संस्था संलग्नीकरिता असणारे शुल्क रु.१,०००/- हे वाढवून रु.१०,०००/- इतके करणे आवश्यक वाटते. तसेच पॅरॉमेडिकल अभ्यासक्रमाव्यतिरिक्त चालणाऱ्या इतर सर्व अभ्यासक्रमाचे संलग्नीकरण शुल्क रु.१,०००/- हे वाढवून रु.५,०००/- इतके करणे आवश्यक वाटते.

तसेच संस्थाचे प्रतिवर्षी संलग्नीकरणाच्या नूतनीकरणाचे असणारे शुल्क रु.५००/- हे वाढवून रु.२,०००/- करणे आवश्यक वाटते.

उपरोक्त प्रमाणे पॅरॉमेडिकल व इतर अभ्यासक्रमांची संस्था संलग्नीकरण व नूतनीकरणाचे शुल्क वाढविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: जनविकास केंद्राअंतर्गत चालणाऱ्या विविध अभ्यासक्रमाकरिता संस्था संलग्नीकरण व नूतनीकरणाचे शुल्क खालीलप्रमाणे वाढविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

अ.क्र.	अभ्यासक्रमाचे नाव	सध्याचे शुल्क (रु.)	सुधारीत शुल्क (रु.)
१)	पॅरॉमेडिकल अभ्यासक्रमाकरिता संस्था संलग्निकरण शुल्क	१,०००/-	१०,०००/-
२)	पॅरॉमेडिकल अभ्यासक्रमा व्यतिरिक्त अभ्यासक्रमाकरिता संस्था संलग्निकरण शुल्क	१,०००/-	४,०००/-
३)	संस्थेचे प्रतिवर्षी संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे शुल्क	५००/-	२,०००/-

[१७] प्रस्तुत विद्यापीठातील शैक्षणिक संकुलप्रणालीचे पदव्युत्तर अधिविभागात रूपांतर करण्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या बैठकीचा प्राप्त झालेला अहवाल विचारार्थ.

(टिपणीः प्रस्तुत विद्यापीठातील सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या संकुलप्रणालीचे रूपांतर पदव्युत्तर अधिविभागात करण्यासंदर्भात दि. १९ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्रमांक ११ (३) नुसार, प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर व डॉ. एस. एस. सूर्यवंशी या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांसह इतर चार सदस्यांचे असे मिळून एकूण ६ सदस्यांची समिती गठीत करण्यात आली होती.

वरील ठरावाच्या अनुषंगाने, गठीत केलेल्या समितीमधील अन्य चार सदस्यांचे मा.कुलगुरुमहोदयांनी दि.२८/१०/२०१३ रोजी नामनिर्देशन केले असून ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. डॉ. कुळकर्णी के. एम., माजी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, २. प्रा. शाळीग्राम ए. डी., पुणे विद्यापीठ, पुणे, ३. प्रा. भोसले पी. एन., शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व ४. मा. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाच्या अनुषंगाने गठीत केलेल्या समितीची बैठक दि.२३/०१/२०१४ रोजी संपन्न झाली असून सदर समितीच्या बैठकीचा अहवाल सोबत जोडण्यात आला आहे. समितीच्या अहवालानूसार सद्यस्थितीतील शैक्षणिक संकुलप्रणालीचे रूपांतर पदव्युत्तर अधिविभागात करून अनुदानित होण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करावा लागणार आहे.

सबब, उक्त बाब विचारार्थ).

ठरावः प्रस्तुत विद्यापीठातील शैक्षणिक संकुलप्रणालीचे पदव्युत्तर अधिविभागात रुपांतर करण्यासाठी गठीत केलेल्या समितीकडून प्राप्त झालेला अहवाल सर्वानुमते स्विकारण्यात आला.

[१८] भगवंत इस्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी. या महाविद्यालयाकडून शै.वर्ष २०१४-१५ करीता एम. ई. (मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) भाग २ या अभ्यासक्रमाचा प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्ताराच्या प्रस्तावाला शिफारस करण्याची बाब विचारार्थ.

टिपणी- शै.वर्ष २०१४-१५ साठी भगवंत इस्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी. या महाविद्यालयाकडून एम. ई. (मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) भाग २ या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

प्राप्त प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८७ व ८२(४) अवये प्रथम महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या शिफारशीकरीता सादर करुन महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या शिफारशीसह व्यवस्थापन परिषदेसमोर शिफारशीस्तव सादर करणे आवश्यक आहे व तदनंतर व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनंतर प्राप्त प्रस्तावावर विद्यापीठ स्तरावरुन विहीत प्रक्रिया होवून प्रस्ताव संबंधित शिखर संस्था व महाराष्ट्र शासनाकडे पुढील कार्यवाहीस्तव सादर करणे आवश्यक आहे. तथापि महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाची बैठक दि.०७/०१/२०१४ रोजी संपन्न झाली असून दरम्यानच्या काळात महाविद्यालय विद्यापीठ विकास मंडळाची बैठक लवकर आयोजित होणार नसल्याने व सदरच्या प्रस्तावावर विहीत वेळेत प्रक्रिया करुन प्रस्ताव संबंधित संचालनालय / शिखर संस्थेकडे सादर करावे लागणार असल्यामुळे म.वि.कायदा १९९४ कलम ८७ व ८२(४)अनुसरुन महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्यावतीने मा.कुलगुरु महोदय यांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

अ.क्र.	महाविद्यालयाचे नाव	मागणी केलेला वर्ग व नैसर्गिक वाढीचे विषय	उपलब्ध होऊ शकणारी विद्यार्थी संख्या	महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाची शिफारस
१.	भगवंत इस्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी	एम. ई. (मॅन्युफफक्चरींग इंजिनिअरींग) भाग २	१८	शिफारस आहे.

सबब, शै.वर्ष २०१४-१५ करीता भगवंत इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी. या महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावाला शिफारस करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: भगवंत इस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी या महाविद्यालयाकडून शै.वर्ष २०१४-१५ करिता एम. ई. (मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) भाग २ या अभ्यासक्रमाच्या प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्ताराच्या प्रस्तावाबाबत महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन शासनास तशी शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[१९] सोलापूर विद्यापीठाच्या संकुलातील शिक्षकांना सहयोगी प्राध्यापक पदावरुन प्राध्यापक पदासाठीच्या Under CAS पदोन्नती देण्यासंदर्भातील तातडीची बाब म्हणून म.वि.कायदा १९९४ मधील कलम १४(७) नुसार माननीय कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीसाठी व विषयनिहाय शिफारस केलेल्या ६ विषय तज्ञांमधून ३ विषय तज्ञांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करणेसाठी समितीची बैठक दिनांक ६.१.२०१४ रोजी झाली असून समितीने खालील नमुद केलेल्या तीन शिक्षकांचे कार्यालयातील अनुषंगिक कागदपत्रे तपासून त्याच्या संदर्भातील अहवाल विद्यापीठास सादर केला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	शिक्षकांचे नाव	धारण केलेल पद	CAS अंतर्गत मागणी पद	छाननी समितीचा अभिप्राय
१	डॉ. सुर्यवंशी एस. एस.	सहयोगी प्राध्यापक	प्राध्यापक	पात्र
२	डॉ. नारायणपेठकर ए. बी.	सहयोगी प्राध्यापक	प्राध्यापक	पात्र
३	डॉ. पी. प्रभाकर	सहयोगी प्राध्यापक	प्राध्यापक	पात्र

उपरोक्त सहयोगी प्राध्यापकांना प्राध्यापक म्हणून CAS अंतर्गत कार्यवाही करण्यासंदर्भात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ७६(२)(ड) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

"विद्यापीठाशी ज्या व्यक्ती संबंधित नसतील अशा आणि ज्या विषयासाठी अध्यापकाची निवड करावयाची असेल त्या विषयाचे ज्यांना विशेष ज्ञान आहे अशा, विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या सहापेक्षा कमी नसतील इतक्या व्यक्तींच्या नामिकेमधून व्यवस्थापन परिषेदेने नामनिर्देशित केलेल्या (किमान) तीन तज्ञ व्यक्ती."

उक्त तीन पात्र शिक्षकामधील डॉ. नारायणपेठकर ए.बी., सहयोगी प्राध्यापक हे दिनांक २८/२/२०१४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. सध्या विद्यापरिषेदेची बैठक प्रस्तावित नाही. त्यामुळे डॉ. नारायणपेठकर यांचा सेवानिवृत्तीचा दिनांक विचारात घेता कायदयातील तरतुदीनुसार प्रत्येकी आठ विषय तज्ञांची नावे अधिष्ठाता आणि संकुल प्रमुखाकडून विषय तज्ञांच्या नावांची यादी घेण्यास मा. कुलगुरु महोदयांनी दिनांक १५/१/२०१४ रोजी मान्यता दिली आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे डॉ. डी.जी.कदम, अधिष्ठाता विज्ञान विद्याशाखा, डॉ. एल.पी. देशमुख, संचालक, पदार्थविज्ञान संकुल व डॉ. आर.आर.पाटील, संचालक, भूशास्त्र यांनी Electronics आणि Geology या दोन विषयाच्या तज्ञांच्या नामिकेची यादी विद्यापीठास सादर केली असून ती सोबत अवलोकनार्थ जोडण्यात आली आहे. विद्यापरिषद प्राप्त यादीतील ६ विषय तज्ञाच्या नावाची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्याची तरतुद आहे. परंतु सध्या विद्यापरिषदेची बैठक प्रस्तावित नसल्याने व सदर प्रक्रिया तातडीने करणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) मधील तरतुदीनुसार विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी सोबतच्या प्राप्त यादीतील विषयनिहाय ६/८ विषय तज्ञांच्या नावाची शिफारस केली आहे.

माननीय कुलगुरुमहोदयांनी विद्यापरिषदेच्या वतीने केलेल्या ६/८ विषय तज्ञांमधून ३ विषय तज्ञांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: सोलापूर विद्यापीठाच्या संकुलातील शिक्षकांना सहयोगी प्राध्यापक पदावरुन प्राध्यापक पदासाठीच्या Under CAS पदोन्नती देण्यासंदर्भातील तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) नुसार मा. कुलगुरुंनी विद्यापरिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीनुसार विषयनिहाय शिफारस केलेल्या विषय तज्ञांमधून आणि आवश्यकतेनुसार अधिकच्या विषयतज्ञांमधून ३ विषय तज्ञांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा.कुलगुरु महोदयांना प्रदान करण्यात आल्याचे सर्वानुमते ठरले.

[२०] शै.वर्ष २०१४-१५ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शिफारशी करण्याची बाब विचारार्थ

(टिपणीः शै.वर्ष २०१४-१५ साठी संलग्नित महाविद्यालयांकडून सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे ए.आय.सी.टी.ई अंतर्गत अभ्यासक्रमाच्या व पारंपारिक अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (४) अन्वये प्रथम महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या शिफारशी करीता सादर करुन महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या शिफारशीसह व्यवस्थापन परिषदेसमोर शिफारशीस्तव सादर करणे आवश्यक आहे व तदनंतर व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनंतर प्राप्त प्रस्तावांवर विद्यापीठ स्तरावरुन विहीत प्रक्रिया होवून प्रस्ताव संबंधित प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाहीस्तव विहीत मुदतीत शिखर संस्था व महाराष्ट्र शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन दि.०७/०१/२०१४ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ सभेसमोर संलग्नित महाविद्यालयांकडून शै.वर्ष २०१४-१५ करीता नैसर्गिक विस्तारांसाठी प्राप्त प्रस्तावांना शिफारस करण्याची बाब सादर केली असता ठराव क्र २ व ८(१) अन्वये महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने सोबतच्या तक्ता 'ब' मधील महाविद्यालयाच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.

सबब, शै.वर्ष २०१४-१५ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शिफारशी करण्याची बाब विचारार्थ).

ठरावः शै.वर्ष २०१४-१५ करिता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांबाबत महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन शासनास शिफारस करण्याचे सर्वानुमते ठरले.

[२१] कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

टिपणी: मा.अध्यक्ष, कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर यानी त्यांच्या महाविद्यालयात सुरु असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त संस्थेच्या संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर महाविद्यालयास एम.बी.ए. या अभ्यासक्रमास शै.वर्ष २००८-०९ पासून ए.आय.सी.टी.ई. व महाराष्ट्र शासनाची कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन शै.वर्ष २००८-०९ पासून उपरोक्त महाविद्यालयाच्या एम.बी.ए. भाग १ या अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास मान्यता देण्यात आलेली होती.

तथापि, गत दोन वर्षापासून सदरील अभ्यासक्रमास मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा अत्यल्प विद्यार्थ्यानी प्रवेश घेतल्याने संस्थेचे खूप आर्थिक नुकसान होत असल्याचे नमूद करुन महाविद्यालयाने शै.वर्ष २०१४-१५ पासून एम.बी.ए. हा अभ्यासक्रम बंद करण्यास्तव रितसर शुल्क भरुन प्रस्ताव सादर केलेला आहे.

अ.क्र.	अभ्यासक्रमाचे नाव	मान्यता मिळालेली विद्यार्थी संख्या	प्रत्यक्ष प्रवेशित विद्यार्थी संख्या
१.	एम. बी. ए. भाग १	६०	३०
२.	एम. बी. ए. भाग २	६०	२०

महाविद्यालय, विषय / विद्याशाखा बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये खालीलप्रमाणे त्रिसदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आलेली होती.

१. डॉ.ए.ए.शेख (अध्यक्ष)

२. प्रा.पी.डी.वैद्य (सदस्य)

३. श्री.एम.एल.अडवाणी (सदस्य)

उपरोक्त समितीने संबधीत महाविद्यालयास भेट देवुन संबधीत महाविद्यालयातील शै.वर्ष २०१४-१५ पासून एम.बी.ए. हा अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणापत्र ए.आय.सी.टी.ई कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्या परिषदेची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी लागणार आहे. तथापि विद्या परिषदेची सभा नजिकच्या काळात लवकर आयोजित होण्याची शक्यता नसल्याने विद्या परिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदय यांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगाव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.बी.ए. भाग १ हे अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगाव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.बी.ए. भाग १ हे अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठरावः **कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[२२] कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग-१ हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

(टिपणी: मा.अध्यक्ष, कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर यानी त्यांच्या महाविद्यालयात सुरु असलेला इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग-१ हे अभ्यासक्रमशै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त संस्थेच्या संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर महाविद्यालयास इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमास शै.वर्ष २००६-०७ पासून ए.आय.सी.टी.ई. व महाराष्ट्र शासनाची कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन शै.वर्ष २००६-०७ पासून उपरोक्त महाविद्यालयाच्या इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग १ या अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास मान्यता देण्यात आलेली होती.

तथापि, गत दोन वर्षापासून सदरील अभ्यासक्रमास मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा अत्यल्प विद्यार्थ्यानी प्रवेश घेतल्याने संस्थेचे खूप आर्थिक नुकसान होत असल्याचे नमूद करुन महाविद्यालयाने शै.वर्ष २०१४-१५ पासून इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम बंद करण्यास्तव रितसर शुल्क भरून प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाविद्यालय, विषय / विद्याशाखा बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये खालीलप्रमाणे त्रीसदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आलेली होती.

१. प्राचार्य डॉ.एस.ए.हलकुडे (अध्यक्ष)
२. डॉ.सौ.एस.एस.आपटे (सदस्य)
३. प्रा.एल.एम.आर.जे.लोबो (सदस्य)

उपरोक्त समितीने संबधीत महाविद्यालयास भेट देवुन संबधीत महाविद्यालयातील शै.वर्ष २०१४-१५ पासून इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणापत्र ए.आय.सी.टी.ई कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्या परिषदेची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी लागणार आहे. तथापि विद्या परिषदेची सभा नजिकच्या काळात लवकर आयोजित होण्याची शक्यता नसल्याने विद्या परिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदय यांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगाव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग १ हे अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी भाग-१ हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१४-१५ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[२३] कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाची शै.वर्ष २०१४-१५ पासून विद्यार्थी प्रवेश क्षमता ९० वरून ६० अशी कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

(टिपणी: मा.अध्यक्ष, कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर यानी त्यांच्या महाविद्यालयात सुरु असलेला कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाची शै.वर्ष २०१४-१५ पासून विद्यार्थी प्रवेश क्षमता ९० वरून ६० अशी कमी करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त संस्थेच्या संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर महाविद्यालयास कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग या अभ्यासक्रमाची शै.वर्ष २००९-१० पासून विद्यार्थी प्रवेश क्षमता ६० वरून ९० अशी जादा करण्यास ए.आय.सी.टी.ई. व महाराष्ट्र शासनाची कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन शै.वर्ष २००९-१० पासून उपरोक्त महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाच्या अतिरीक्त ३० (६०+३०=९०) विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या प्रथम संलग्निकरणास मान्यता देण्यात आलेली होती.

तथापि, गत दोन वर्षापासून सदरील अभ्यासक्रमास मंजुर प्रवेश क्षमतेपेक्षा अत्यल्प विद्यार्थ्यानी प्रवेश घेतल्याने संस्थेचे खूप आर्थिक नुकसान होत असल्याचे नमूद करुन महाविद्यालयाने शै.वर्ष २०१४-१५ पासून कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग या अभ्यासक्रमाची अतिरिक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता ३० (६०+३०=९०) म्हणजेच विद्यार्थी क्षमता ९० वरुन ६० करण्यास्तव रितसर शुल्क भरून प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाविद्यालय, विषय / विद्याशाखा बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये खालीलप्रमाणे त्रीसदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आलेली होती.

१. प्राचार्य डॉ.एस.ए.हलकुडे (अध्यक्ष)
२. प्रा.डॉ.सौ.एस.एस.आपटे (सदस्य)
३. श्री.आर.एस.मेंते (सदस्य)

उपरोक्त समितीने संबधीत महाविद्यालयास भेट देवुन संबधीत महाविद्यालयातील शै.वर्ष २०१४-१५ पासून कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग या अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ९० वरुन ६० अशी करण्याची शिफारस केलेली आहे.

ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणापत्र ए.आय.सी.टी.ई कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्या परिषदेची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेकची मान्यता घ्यावी लागणार आहे. तथापि विद्या परिषदेची सभा नजिकच्या काळात लवकर आयोजित होण्याची शक्यता नसल्याने विद्या परिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदय यांनी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगाव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाची शै.वर्ष २०१४-१५ पासून विद्यार्थी प्रवेश क्षमता ९० वरून ६० अशी कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी म.वि.कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने मा.कुलगुरु महोदयांनी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: कै.सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशिय संस्था संचलित भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयात सुरु असलेला कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग भाग १ या अभ्यासक्रमाची शै.वर्ष २०१४-१५ पासून विद्यार्थी प्रवेश क्षमता ९० वरुन ६० अशी कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये, मा.कुलगुरुमहोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[२४] महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार, विविध अधिकारमंडळावर निवडून, नामनिर्देशनाद्वारे, स्वीकृत सदस्य म्हणून ३८५, ३८६, ३८८ (ए), ३८९, ३९१, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९६ (ए), ३९७ व ४१२ प्रमाणे नॉमिनेशन फॉर्म या परिनियमात करण्यात आलेल्या दुरुस्त्या आणि व्यवस्थापन परिषदेने अधिसभेस शिफारस न केलेले परिनियम व परिनियम समितीने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेले परिनियम पुनश्चः विचारार्थ.

(टिपणीः महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार, विविध अधिकारमंडळावर निवडून, नामनिर्देशनाद्वारे, स्वीकृत सदस्य म्हणून ३८५, ३८६, ३८८ (ए), ३८९, ३९१, ३९२, ३९३, ३९४, ३९५, ३९६, ३९६ (ए), ३९७ व ४१२ प्रमाणे नॉमिनेशन फॉर्म या परिनियमात दुरुस्त्या करण्याबाबत विषय दि.१७ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या परिनियम समितीच्या बैठकीत विषय क्र.२ अन्वये, सादर करण्यात आला होता. त्यावर झालेला ठराव खालीलप्रमाणे आहे.

ठराव क्र.२	महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार, विविध अधिकार मंडळावर निवडून, नामनिर्देशनाद्वारे, स्वीकृत सदस्य म्हणून येण्याकरिता पात्रतेच्या अटी व शर्तीच्या व निवडणूकीसंदर्भातील सोलापूर विद्यापीठाने नव्याने तयार केलेले परिनियम SUSS.३०१ ते SUSS.३८७ व त्या अनुषंगाने परिशिष्ट II, III, IV, V तसेच दीक्षांतसंदर्भात परिनियम क्र.SUSS.३८८ ते SUSS.३९१ व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आल्या.

वरीलप्रमाणे परिनियम समितीची शिफारस दि.०२/०३/२०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र.१७ अन्वये, सादर करण्यात आली असता, त्यावर झालेला ठराव खालीलप्रमाणे आहे.

ठराव क्र. १७	अ) सोलापूर विद्यापीठाने नव्याने तयार केलेले परिनियम क्रमांक SUSS.301, 303, 305, 306, 309, 310, 313, 314, 318 ते 340, 341 ते 391 व या अनुषंगाने परिशिष्ट II, III, IV, V बाबत परिनियम समितीने केलेली शिफारस स्विकारुन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. ब) विद्यापीठाचे नविन परिनियम तयार करताना महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१४/०९/२००९ मध्ये काही अतिरिक्त बाबींचा समावेश करता येईल का याबाबत योग्य ती माहिती प्राप्त करावी.

परिनियम समितीने SUSS.३०१ ते SUSS.३८७ व त्या अनुषंगाने परिशिष्ट I, III, IV, V तसेच दीक्षांतसंदर्भात परिनियम क्र. SUSS.३८८ ते SUSS. ३९१ व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेले होते. परंतु, व्यवस्थापन परिषदेने त्यापैकी ३०२, ३०४, ३०७, ३०८, ३११, ३१२, ३१५ ते ३१७ हे परिनियम वगळून उर्वरित परिनियम अधिसभेस शिफारस केले. व्यवस्थापन परिषदेची ही शिफारस अधिसभेच्या दि.२४/०३/२०१२ रोजीच्या बैठकीत विषय क्र.६ अन्वये, सादर करण्यात आली असता, त्यावर झालेला ठराव खालीलप्रमाणे आहे.

ठराव क्र. ६	सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. चव्हाण सी. एस. यांनी अनुमोदन दिले. त्यावर खालील अधिसभा सदस्यंनी आपले विचार व्यक्त केले. १) डॉ. बारबोले ए. एन. २) श्री. रिसबूड एस. एच. ३) प्राचार्य डॉ. गणगे के. एन. त्यानंतर सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या पुनश्चः विचारार्थ पाठविण्याचे ठरले.

वरील ठरावानुसार, हा विषय दि.१६/१०/२०१२ रोजीच्या बैठकीत विषय क्र.४ अन्वये, व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर केला असता, त्यावर झालेला ठराव खालीलप्रमाणे आहे.

ठराव क्र. ४	सदरचा विषय परिनियम समितीकडे पाठवावा असे ठरले.

वरील ठरावानुसार, हा विषय दि.०३/०१/२०१४ रोजीच्या परिनियम समितीच्या बैठकीत विषय क्र.२ अन्वये, पुश्नचः विचारार्थ सादर केला असता, त्यावर झालेला ठराव खालीलप्रमाणे आहे.

ठराव क्र.२	महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मध्ये दि.२४/०३/२००९ च्या राजपत्रानुसार, २४ (A) हे कलम नव्याने समाविष्ट करण्यात आले आहे. या कलमान्वये प्राप्त अधिकारास अनुसरुन शासनाने दि.१४/०९/२००९ च्या आदेशानुसार, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठी पात्रतेच्या अटी विनिर्दिष्टीत केल्या आहेत. दि.१२/०८/२०१० रोजीच्या शुध्दीपत्रान्वये, दि.०१/१२/२०१० रोजीच्या corringendum अन्वये व दि.०५/०४/२०१३ च्या आदेशान्वये, दि.१४/०९/२००९ या आदेशातील तरतूदीमध्ये दुरुस्त्या सुचविण्यात आलेल्या आहेत. या सर्व बाबी विचारात घेता विद्यापीठास त्यात बदल करण्याच्या मर्यादा लक्षात घेवून, परिनियम समितीने आवश्यक ते बदल करुन परिनियम तयार केले आहेत. त्यानुसार परिनियम क्र.SUSS.३०१ ते SUSS.३८७ व त्या अनुषंगाने परिशिष्ट II, III, IV, V तसेच दीक्षांतसंदर्भात परिनियम क्र.SUSS.३८८ ते SUSS.३९१ व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात येत आहेत.

सबब, महाराष्ट्र शासनाच्या दि.१४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन राजपत्रानुसार, विविध अधिकारमंडळावर निवडून, नामनिर्देशनाद्वारे, स्वीकृत सदस्य याकरिता असणारे परिनियम क्र.SUSS.३०१ ते SUSS.३८७ व त्या अनुषंगाने परिशिष्ट II, III, IV, V तसेच दीक्षांतसंदर्भात परिनियम क्र.SUSS.३८८ ते SUSS.३९१ व्यवस्थापन परिषदेच्या पुनश्चः विचारार्थ).

ठरावः **महाराष्ट्र शासनाच्या दि. 14 सप्टेंबर, 2009 च्या आदेशानुसार आणि वेळोवेळी प्राप्त शुध्दीपत्रानुसार विविध अधिकार मंडळाचे सदस्य होण्यासाठी विहीत केलेल्या निकषांचा परिनियमामध्ये समावेश करण्यासाठी परिनियम समितीने पुर्नविचार करुन शिफारस केलेले परिनियम क्रमांक SUSS.301 ते SUSS.386, परिशिष्ट III, IV, V आणि दीक्षांतसंदर्भातील परिनियम क्र.SUSS.387 ते SUSS.390 स्विकारुन अधिसभेस मान्यतेची सर्वानुमते शिफारस करण्यात आली.**

[२५] दि.०३/०२/२०१४ रोजी झालेल्या बांधकाम समितीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव.

(टिपणी: बांधकाम समितीची बैठक दि.०३/०२/२०१४ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडला आहे. परिनियम 339 (f) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

After the meeting, the minutes shall be drawn by the Member Secretary who shall get them approved from the Chairman. The recommendations of the Building and Works Committee shall be placed before the Management Council for its approval.

त्यानुसार दि.०३/०२/२०१४ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव).

ठराव: दि.०३/०२/२०१४ रोजी झालेल्या बांधकाम समितीचा कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषयः

[२६(१)] नॅशनल ॲक्रेडिटेशन ॲन्ड असेसमेंट कॉन्सिल (NAAC) यांच्याकडून सोलापूर विद्यापीठाचे मुल्यांकन करुन घेण्याकरिता विद्यापीठात मुल्यांकन आणि अधिस्वीकृती प्रक्रिया (Assessment and Accreditation process) सुरु करण्याची बाब विचारार्थ.

(टिपणीः महाराष्ट्र शासनाच्या व शिखर संस्थांच्या मार्गदर्शक सूचनानुसार, विद्यापीठाचे व संलग्नित महाविद्यालयांचे मुल्यांकन व अधिस्वीकृती (Assessment & Accreditation) करुन घेणे अनिवार्य आहे. विद्यापीठाच्या विविध संकुलाच्या व त्यातंर्गत विभागाच्या संशोधन वाढीस चालना मिळण्याच्या दृष्टीने विद्यापीठाचे मुल्यांकन व प्रप्यापन करुन घेणे आवश्यक आहे.

विद्यापीठाच्या स्थापनेनंतर विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून २ (एफ) व १२ (बी) या दोन्हीही मान्यता मिळालेल्या असून विद्यापीठास ९ वर्षे पूर्ण झालेली आहेत. आता सोलापूर विद्यापीठ नॅककडून मुल्यांकन करुन घेण्यास पात्र आहे. नॅकच्या वेबसाईटवरील विद्यापीठाकरिता उपलब्ध करण्यात आलेल्या मॅन्युअलनुसार विद्यापीठास मुल्यांकन व अधिस्वीकृतीची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.

विद्यापीठास भारत सरकारच्या दि.१९/०१/२०१३ रोजी प्रसिध्द झालेल्या राजपत्रातील अ.क्र. ४ Mandatory Assessment and Accreditation मधील ४.१ ते ४.४ नुसार, नॅक कडून मुल्यांकन व अधिस्वीकृती करुन घेण्याची प्रक्रिया सुरु करावी लागणार आहे तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.२७/१२/२०१३ रोजीच्या पब्लिक नोटीसनुसार, all such Universities / Institutions referred to in Regulation 4 of the aforesaid Regulations and receiving financial assistance from the UGC must apply to the recognized Accreditation Agency latest by 1st June, 2014: failure to do so may lead to discontinuation of financial assistance by the UGC to such Universities / Institutions from 1st April, 2015 onwards असे नमूद केलेले आहे.

सबब, सोलापूर विद्यापीठास नॅक कडून मुल्यांकनाचा दर्जा प्राप्त करण्याकरिता मुल्यांकन आणि अधिस्वीकृती (Assessement and Accreditation) प्रक्रिया सुरु करण्याची बाब विचारार्थ).

ठरावः नॅशनल ॲक्रेडिटेशन ॲन्ड असेसमेंट कॉन्सिल (NAAC) यांच्याकडून सोलापूर विद्यापीठाचे मुल्यांकन करुन घेण्याकरिता विद्यापीठात मुल्यांकन आणि अधिस्वीकृती प्रक्रिया (Assessment and Accreditation process) सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[२६(२)] जिल्हा वार्षिक योजना २०१३-१४ नाविन्यपूर्ण योजनेतंर्गत "देवाग्या Reincode माहिती तंत्रज्ञान कौशल्य विकास प्रकल्प राबविणे" या योजनेतून मंजूर झालेल्या रु.२० लाख अनुदानातून हा प्रकल्प राबविण्याकरिता ई-टेंडरिंग प्रक्रिया राबविण्याबाबत.

(टिपणी: जिल्हा वार्षिक योजना २०१३-१४ मधून नाविन्यपूर्ण योजनेतंर्गत "देवाग्या Reincode माहिती तंत्रज्ञान कौशल्य विकास प्रकल्प राबविणे" हा प्रकल्प विद्यापीठात व संलग्नित महाविद्यालयात राबविण्याकरिता मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती सोलापूर यांचे पत्र विद्यापीठास दि.२५/११/२०१३ रोजी प्राप्त झाले होते.

त्यानुषंगाने, विद्यापीठाने दि.०४/१२/२०१३ रोजी मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती सोलापूर यांच्याकडे प्रस्ताव सादर केलेला होता.

मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती सोलापूर यांनी दि.०४/०२/२०१४ रोजीच्या पत्रानुसार विद्यापीठास उपरोक्त प्रकल्प राबविण्यास व याकरिता रु.२० लाख अनुदान मंजूर केल्याचे कळविले आहे. या पत्रातील मुद्दा क्र. ४ "प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर कामे विहीत मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक आहे. कॅशफ्लो प्रमाणे वितरीत करण्यात आलेला निधी मार्च २०१४ अखेर पर्यंत १०० टक्के खर्च होण्यासाठी वस्तुनिष्ठ नियोजन करावे. निधी १०० टक्के खर्च होणार नसल्याचे दिसून आल्यास तात्काळ अखर्चित निधी जिल्हा नियोजन समितीस समर्पित करावा" आणि मुद्दा क्र. ६ नुसार, "कामासाठी निविदा मागविणे, स्वीकृत करणे व खरेदीबाबतचे सर्व अधिकार शासनाचे प्रचलित पध्दतीप्रमाणे राहतील, याबाबत कोणत्याही खाजगी संस्थेचा प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष सहभाग घ्यायचा असल्यास त्यासाठी आवश्यक असणारी सर्व प्रक्रिया संबंधित कार्यान्वयिन यंत्रणेने शासन नियमानुसार पार पाडावी" असे नमूद केले आहे.

कामाच्या व खरेदीच्या निविदा मागविण्याकरिता किमान २१ दिवसाचा कालावधी देण्यात येतो. दि.३०/०१/२०१४ रोजीच्या ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार, हा कालावधी कमी करुन तो रु. ५ लाखापेक्षा कमी कामाकरिता ५ दिवस, रु.५ ते १० लाखापर्यंतच्या कामाकरिता ७ दिवस आणि रु.५० लाखापेक्षा अधिक किंमतीच्या कामाकरिता ७ दिवस याप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे.

उक्त बाब विचारात घेता, या प्रकल्पाच्या कामाच्या व खरेदीच्या निविदा मागविण्याचा कालावधी वरील शासन निर्णयानुसार निश्चित करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त दि.२५/११/२०१३ च्या पत्रानुसार जिल्हा वार्षिक योजना २०१३-१४ साठी सादर केलेल्या प्रस्तावास "देवाग्या Reincode माहिती तंत्रज्ञान कौशल्य विकास प्रकल्प राबविणे" या योजनेतंर्गत मंजूर झालेल्या रु.२० लाख अनुदानातून प्रकल्पावर खर्च करण्यासाठी कमी अवधी असल्याने (३१ मार्च, २०१४) शासन परिपत्रक क्र. निविदा-२०१२/प्र.क्र.९७/पंरा-७, दि.३० जानेवारी, २०१४ च्या धर्तीवर सदर प्रकल्प राबविण्यासाठी ७ दिवसाची निविदा (ई-टेंडर) देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-	**सही/-**
सचिव	**अध्यक्ष**
व्यवस्थापन परिषद	**व्यवस्थापन परिषद**